लोकमत सिंधुदुर्ग, शनिवार, दि. २७ डिसेंबर २०१४

# जीवनात श्रमाचे महत्त्व सर्वाधिक : श्रीपाद हळबे

**कसई-दोडामार्ग :** सात दिवस चालणाऱ्या श्रमसंस्कार शिबिरात सर्व विद्यार्थ्यांनी मनापासून भाग घेणे आवश्यक आहे. श्रम म्हणजे काय, याचे ज्ञान उत्तमप्रकारे येथे अनुभवास येणार आहे, असे प्रतिपादन लक्ष्मीबाई हळबे महाविद्यालयाचे अध्यक्ष श्रीपाद हळबे यांनी वझरे येथे केले.

नवनिर्माण शिक्षणसंस्था रत्नागिरी संचलित लक्ष्मीबाई सीताराम हळबे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने वझरे येथे श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी श्रीपाद हळबे बोलत होते. यावेळी नवनिर्माण शिक्षणसंस्था अध्यक्ष अभिजित हेगशेटये, प्राचार्य व्ही. ए. पाटील, शिवसेना तालुकाप्रमुख बाबुराव धुरी, उद्योजक विवेकानंद नाईक, सूर्यकांत परमेकर, वझरे सरपंच सागर नाईक, सुचन कोरगावकर, मोहन नातू आदी मान्यवर उपस्थित होते.

शिरीष नाईक



वझरे येथे आयोजित श्रमसंस्कार शिबिराला कॉलेजचे अध्यक्ष श्रीपाद हळबे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी अभिजित हेगशेट्ये, बाबूराव धुरी, विवेकानंद नाईक, आदी उपस्थित होते.

हळबे यांच्या सहकार्यातून हे कॉलेज एक आदर्श बनत आहे, असे विचार बाबूराव धुरी यांनी व्यक्त केले. यावेळी संस्थाअध्यक्ष अभिजित हेगशेट्ये, सरपंच सागर नाईक यांनी आपले विचारी मांडले. प्राचार्य पाटील यांनी प्रस्तावना केली. सूत्रसंचालन एस. एन. जाधव यांनी केले. आभार आर. ए. मोरे यांनी मानले. (वार्ताहर)